| २२ ऑक्टोबरची कोरोना स्थिती | |
|---|---|
| बाधित रुग्ण | १६९ |
| नगर शहर | १८ |
| अकोले | १२ |
| संगमनेर | १६ |
| कोपरगाव | १७ |
| राहाता | २० |
| श्रीरामपूर | १६ |
| राहुरी | १० |
| नेवासे | ०४ |
| शेवगाव | १३ |
| पाथर्डी | ०१ |
| जामखेड | ०० |
| कर्जत | ०९ |
| श्रीगोंदे | २३ |
| पारनेर | ०४ |
| नगर ग्रामीण | ०४ |
| भिंगार | ०० |
| इतर जिल्हा | ०२ |
| मिलिटरी हॉस्पिटल | ०० |
| काल बरे झालेले | ४३२ |
| कालचे एकूण मृत्यू | १३ |
| एकूण बाधित | ३५३१२२ |
| एकूण बरे झालेले | ३४४६३६ |
| एकूण मृत्यू | ६९९८ |
| उपचार सुरू असलेले | १४८८ |
| कालचे लसीकरण | १८४०५ |
| एकूण लसीकरण | ३२५९०७८ |
| पहिला डोस | २४१३९१३ |
| दुसरा डोस | ८४५१६५ |

## महागाईविरोधात श्रीरामपुरात चुलीवर भाकरी भाजत केला केंद्राचा निषेध



**श्रीरामपूर (वार्ताहर) :** पेट्रोल-डिझेल व गॅस दरवाढीने सर्वसामान्याचे जीणे मुश्किल केले आहे. यावर कोणीही बोलायला तयार नाही. आघाडी सरकारच्या काळात भाजपाची सत्ता नसताना भाजपाचे नेते डोक्यावर गॅसटाकी घेऊन आंदोलन करत होते. आता त्यांचेच केंद्र सरकार असताना पेट्रोल-डिझेल व गॅस दरवाढीचा भडका झालेला असताना हे पुढारी, नेते मुके प्राणी झाले असल्याचे मत नगराध्यक्षा अनुराधा आदिक यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने पेट्रोल, डिझेल व गॅस दरवाढीविरोधात काल निषेध म्हणून शहरातील प्रशासकीय इमारतीसमोर चूल मांडून भाकरी करत केंद्राचा निषेध करण्यात आला. यावेळी आदिक बोलत होत्या.

याप्रसंगी राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्षा अर्चना पानसरे, तालुकाध्यक्षा पुष्पा कवडे, शहर कार्याध्यक्षा सोनल मुथा, युवक राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सचिन पवार, शहराध्यक्ष सोहेल शेख, कामगार नेते दीपक चव्हाण आदी उपस्थित होते. यावेळी नायब तहसीलदार अशोक उगले यांना निवेदन देण्यात आले.

## कोरोनाचा धोका कमी झालेला नाही, लसीकरण मोहीम व्यापकपणे राबविण्याची गरज : मुश्रीफ

**अकोले (वार्ताहर) :** राज्याची लोकसंख्या ११ कोटी असून, त्यात विविध प्रकारातील ५ कोटी कामगार आहेत. या कामगारांपैकी फक्त ८० हजार कामगारच संरक्षित आहेत. उर्वरित ४ कोटी २० लाख कामगारांच्या नोकऱ्या अशाश्वत आहेत. या कामगारांना शाश्वत मदत होईल, अशी खास कामगार योजना आघाडी सरकार लवकरच आणत आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.

महाराजा लॉन्स येथे काल आयोजित राष्ट्रवादी कार्यकर्ता मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. डॉ. किरण लहामटे होते.

याप्रसंगी अशोक भांगरे, 'अगस्ती'चे उपाध्यक्ष सीताराम गायकर, यमाजी लहामटे, प्रदेश सरचिटणीस विनोद हांडे, जिल्हा कार्याध्यक्ष संदीप वर्पे, युवक जिल्हाध्यक्ष कपिल पवार, जि.



प. सदस्या सुनीता भांगरे, अमित भांगरे, सरपंच दिलीप भांगरे, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश खांडगे आदी उपस्थित होते.

मुश्रीफ म्हणाले, वयाची ६५ वर्षे पूर्ण केलेले निराधार वयोवृद्ध तसेच अपंग, दिव्यांग व परित्यक्ता आणि नाहीरे घटकांतील इतर लोकांसाठी दिलासादायक काम सरकार करीत आहे. यासाठी लवकरच २१ हजार वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ५० हजार करण्यात येणार आहे. सर्व घटकांतील लोकांचे जीवन आनंदमय करण्यात व राज्यातील सर्वच कामगारांना नोकरीत सुरक्षा दिल्यानंतर राज्यात भाजपने पुन्हा सत्तेवर येण्याचा नादच करायचा नाही.

कोरोनाच्या २ लाटांत आपण ३ लाख लोक गमावले. दुसऱ्या लाटेत लोकांना ऑक्सिजन, रेमडीसीविर इंजेक्शन्स, आयसीयू बेडअभावी हाल झाले व सर्वत्र पळापळ करावी लागली. तिसरी लाट येणार की नाही याबाबत एकमत होत नसले तरीदेखील सर्वांनीच काळजी घेतली पाहिजे. सर्वत्रच अनलॉक झाले असताना कोरोनाबाबतीत जिल्हा अव्वल स्थानी असून, काही ठिकाणी लॉकडाऊन सुरू आहे. त्यात संगमनेर तालुका पहिल्या क्रमांकावर आहे. दिवाळीनंतर कोरोनाचा धोका वाढण्याची शक्यता लक्षात घेऊनच नागरिकांनी काळजी घ्यावी.

मेळाव्यास मोठ्या संख्येने लोक विनामास्क उपस्थित होते. सामाजिक अंतर न पाळता एकमेकांना खेटून बैठक व्यवस्था होती.

माजी आ. पिचड पिता-पुत्रांचा नामोल्लेख टाळून मुश्रीफ म्हणाले, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांनी सलग ४० वर्षे ज्यांना महत्त्वाची पदे दिली, आदिवासी विकासखाते देऊन राज्याची तिजोरी हातात दिली, त्यांनी २०१९च्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांचा विश्वासघात केला. ते भाजपात गेल्यानंतर जनता पेटून उठली व त्यांची जागा कोठे आहे ते दाखवून दिले. या ऐतिहासिक परिवर्तनात अशोक भांगरे व कार्यकर्त्यांनी डॉ. किरण लहामटे यांना आमदार केले. विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात घराबाहेर पडले तर फक्त पाऊस व घरात दूरदर्शनवर फक्त संजय राऊत अशीच चर्चा होती. पण पवारांनी राज्यात शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री करून आघाडी सरकार सत्तेवर आणले. सरकारने कोरोना, अतिवृष्टी, चक्रीवादळ अशा संकटांवर मात करून लोकहिताची कामे पूर्ण करण्यावर भर देऊन विकासकामांबाबत सरकार आघाडीवर आहे.

मुश्रीफांच्या हस्ते तालुक्यातील बारी, राजूर, गुरवझाप येथील रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन झाले. अकोले नगरपंचायत प्रभाग ३ मध्ये राष्ट्रवादीच्या पक्ष शाखेचे उद्घाटन, धुमाळवाडी ग्रामपंचायत अंतर्गत हुतात्मा स्मारकाचे १ कोटी ५० लाख खर्चून सुशोभीकरण, अकोले बाजारतळावर ४ कोटी खर्चून करण्यात येणाऱ्या सुशोभीकरण योजनेचे भूमिपूजन केल्यानंतर महाराजा लॉन्स येथे कार्यकर्ता मेळावा पार पडला.

## प्रदूषण टाळण्यासाठी सप्ताहातील एक दिवस इंधनविरहित वाहनांचा वापर करा : सौ. तांबे

**संगमनेर (वार्ताहर) :** आजच्या विज्ञान युगात मानवाने सर्व स्तरावर प्रगती केली. मात्र मानवाच्या चुकांमुळे पृथ्वीवरील वातावरणातील जल, अग्नी, वायू, ध्वनी व आकाशात होणारे प्रदूषण, तसेच इंधनयुक्त वाहनांच्या अतिवापरामुळे वाहनातून निघणाऱ्या धुरामुळे वातावरणातील हवेत मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्ष सौ. दुर्गा तांबे यांनी केले.

नगरपरिषद, लायन्स क्लब व संगमनेर महाविद्यालय राष्ट्रीय सेवायोजना यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या सायकलफेरीच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी मुख्याधिकारी राहुल वाघ, 'लायन्स'च्या अध्यक्षा सौ. सुनीता पगडाल, प्राचार्य अरुण गायकवाड, राष्ट्रीय सेवायोजनेचे अधिकारी डॉ. सचिन कदम, एनएसएसचे जिल्हा समन्वयक प्रा. फलफले, नगरपरिषदेचे नोडलप्रमुख प्रमोद लांडे आदी उपस्थित होते.

राज्य शासनाच्यावतीने सर्व नगरपरिषदांसाठी पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सायकलफेरीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी सौ. तांबे म्हणाल्या, इंधनयुक्त वाहनांच्या अतिवापरामुळे त्यातून निघणारा धूर, विषारी द्रव्य फेकले जात असल्यामुळे वातावरणावर त्याचा अनिष्ट परिणाम होत असतो. त्यामुळे निसर्गाचे ऋतुचक्रसुद्धा बदलले आहे. बदललेल्या वातावरणाचा मानवी जीवनावर अनिष्ट परिणाम होत आहे. त्यामुळे इंधनविरहित म्हणजेच सायकल. विजेवर चालणारी वाहने यांचा जास्तीत जास्त वापर करावा. तसेच आठवड्यातील १ दिवस सायकल व विजेवर चालणाऱ्या वाहनांचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

संगमनेर महाविद्यालयाच्या प्रांगणातून सुरू सायकल फेरी बसस्थानक, नवघर गल्ली, तीनबत्ती चौक, मेनरोड या मार्गावरून जाऊन नगरपरिषदेच्या प्रांगणात समारोप झाला.

## शहरातील पाणीपुरवठा आजपासून विस्कळीत

**अहमदनगर :** महावितरण कंपनीकडून आज (शनिवारी) दुरूस्ती कामांसाठी शटडाऊन घेण्यात येणार आहे. या काळात मुळानगर, विळद येथील पंपिंग हाऊस येथून होणारा पाण्याचा उपसा बंद राहणार असल्यामुळे शहरातील पाणी वितरणासाठीच्या टाक्या भरता येणार नाहीत. त्यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरांत १ दिवस विलंबाने पाणीपुरवठा होईल. बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरांतील गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सूर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर तसेच स्टेशन रोड, विनायकनगर, मुकुंदनगर, केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर भागांत शनिवारऐवजी रविवारी पाणीपुरवठा होईल. शहराच्या सर्जेपुरा, मंगलगेट, रामचंद्र खुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडईसह सावेडीस रविवारऐवजी सोमवारी, सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्ली दरवाजा, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार भागाला सोमवारऐवजी मंगळवारी पाणीपुरवठा होईल.

## समन्यायी पाणीवाटप कायद्यात सुधारणेसाठी जलसंपदा मंत्र्यांसमवेत बैठक घेऊ : आ. काळे

**कोपरगाव (वार्ताहर) :** पाण्याच्याबाबतीत कोणावरही अन्याय होऊ नये हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून २००३मध्ये समन्यायी पाणीवाटप कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला. या कायद्यामुळे जोपर्यंत जायकवाडीमध्ये ६५ टीएमसी पाणीसाठा होत नाही तोपर्यंत नगर-नाशिकच्या धरणांमधून जायकवाडीत पाणी सोडावे लागते. हे गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रात काहीसे अन्यायकारक असल्यामुळे या समन्यायी पाणीवाटप कायद्यात सुधारणा करण्याबाबत जलतज्ज्ञ व शिष्टमंडळासह जलसंपदामंत्री जयंत पाटील यांच्यासमवेत लवकरच बैठक घेऊ, अशी ग्वाही आ. आशुतोष काळे यांनी दिली.

शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख राजेंद्र झावरे यांनी नुकतीच काळे यांची भेट घेऊन समन्यायी पाणीवाटप कायद्यात सुधारणा करण्यासाठी पुढाकार घेऊन गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबतचे निवेदन दिले.

यावेळी काळे यांनी सांगितले, समन्यायी पाणीवाटप कायद्यात सुधारणा करणे गरजेचे आहे. याबाबत मी लाभधारक शेतकऱ्यांच्या बाजूने आहे. समन्यायी पाणीवाटप कायद्यात सुधारणा करण्याबाबत विधानसभेतदेखील प्रश्न उपस्थित करून या प्रश्नाचे गांभीर्य पाटील यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. जायकवाडी धरणसाठ्यात ६५ टीएमसी साठा झाला नाही तर त्याचा थेट परिणाम गोदावरी कालव्यांच्या रोटेशनवर होतो.

त्यामुळे या कायद्यात काहीशा त्रुटी असल्याचे सर्वांच्याच लक्षात आले आहे. समन्यायी पाणीवाटप कायद्याविरोधात न्यायालयीन लढाई सुरू असून, ती थांबणार नाही. समन्यायी पाणीवाटप कायद्याने कुणावरही अन्याय होता कामा नये. या कायद्यात सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यासाठी लवकरच शिष्टमंडळासह पाटील यांच्यासोबत बैठक घेणार असल्याचे काळे यांनी सांगितले.

याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख शिवाजी ठाकरे, शहरप्रमुख कलविंदरसिंग डडीयाल, भरत मोरे, तुषार विध्वंस, रावसाहेब थोरात उपस्थित होते.

## रस्तापूरच्या उपसरपंचपदी सेनेचे अंबाडे बिनविरोध

**चांदे (वार्ताहर) :** नेवासे तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या रस्तापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिवसेनेचे बापूसाहेब रावसाहेब अंबाडे यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली. ही निवडी प्रक्रिया ग्रामपंचायत कार्यालयात झाली.

संजय अंबाडे यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदावर बापूसाहेब अंबाडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. निवडणूक प्रक्रिया सरपंच वसंतराव उकिर्डे व ग्रामविकास अधिकारी शरद फाटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य छोटूमियाँ शेख, सनी गाढवे, अनिल चव्हाण, सौ. मीरा मचे, सौ. शोभा उकिर्डे, सौ. लंकाबाई डांगे, सौ. केशरबाई नजन, नानासाहेब अंबाडे, विजया अंबाडे, अण्णासाहेब अंबाडे, भाऊसाहेब सावंत, सुरेश अंबाडे, सुरेश डाके, सुंदरदास हारकळ, मच्छिंद्र आढाव, विठ्ठल भाकरे, संजय भाकड, जनार्धन भाकरे , हरिभाऊ मचे आदी उपस्थित होते.

## पत्नीचा निर्घृण खून करून फरार झालेला पती जेरबंद

**कर्जत (वार्ताहर) :** तालुक्यातील राशीन येथे सिद्धटेक रस्त्यावर राहुल सुरेश भोसले (अजिंठानगर, पुणे) यांनी त्यांची पत्नी दीपाली (राशीन, ता. कर्जत) आणि मेहुणी लता बारकू उर्फ गंगाराम आढाव यांच्यावर चाकूने हल्ला केला. यात दीपाली ठार झाल्या तर लता जखमी झाल्या आहेत. यानंतर फरार झालेल्या राहुलला कर्जत पोलिसांनी जेरबंद केले.

याप्रकरणी लता आढाव यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे, मी आणि माझी बहीण दीपाली सिद्धटेक रोडवर असलेल्या साईनाथ कलेक्शन दुकानात कामासाठी नेहमीप्रमाणे जात असताना सकाळी नऊच्या सुमारास दाजी राहुल भोसले आडवे आले आणि त्यांनी दीपा-लीस 'माझा मोबाईल तुझ्याकडे आहे तो परत दे', असे म्हणाले. त्यावेळी दीपालीने 'माझ्याकडे तुमचा मोबाईल नाही' असे सांगितले. राहुलने तिला चापट मारली आणि त्यानंतर त्याच्याजवळ असलेल्या चाकूने दीपालीच्या गळ्यावर तीन-चारवेळा चाकूने वार करताच ती खाली कोसळली. त्यावेळी मी तिला वाचवण्यासाठी मदत करत असताना माझ्यावरही चाकूने वार केला. माझ्या डोक्याला दुखापत झाली. मी हातामध्ये असलेल्या डब्याने राहुलला मारहाण करू लागताच तो तेथून पळून गेला. यानंतर इतरांच्या मदतीने दीपा-लीस दवाखान्यात घेऊन जात असताना तिचे रस्त्यात निधन झाले.

पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी तात्काळ घटनास्थळ गाठून आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू केले. दरम्यान आरोपी माळवाडी परिसरातून दौंडच्या दिशेने गेल्याबाबत माहिती मिळताच पोलिसांची ३ पथके करून करमाळा, दौंड आणि पुण्यास रवाना करण्यात आली होती. ग्रामसुरक्षा यंत्रणेला कॉल दिले. स्थानिक नागरिकांना मदतीला घेतले तरीही आरोपी गुंगारा देत होता. शेवटी सायंकाळी ६ वाजता कर्जत पोलिसांच्या प्रयत्नांना यश आले. आरोपी रात्री पळून जाण्याच्या इराद्याने खूप मोठ्या काठड्यात लपून बसला होता. त्यास ताब्यात घेतले असून, त्याने गुन्हा कबूल केला आहे.

## आघाडी सरकारमुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबात दिवाळीला अंधार : आ. पाचपुते

**श्रीगोंदे (वार्ताहर) :** ठाकरे सरकारच्या शेतकरी द्वेषामुळे हजारो शेतकरी कुटुंबांच्या घरात ऐन दिवाळीत अंधार पसरला असून, शेतकऱ्यांची दिवाळी काळी करण्यास सरकारचा नाकर्तेपणा कारणीभूत आहे. वारेमाप आश्वासने व घोषणांचा पाऊस पाडून एकही घोषणा कृतीत न आणणाऱ्या सरकारने आमच्या प्रश्नांची जाहीर उत्तरे द्यावीत, अन्यथा जनतेची व शेतकऱ्याची फसवणूक केल्याप्रकरणी सपशेल माफी मागावी, अशी मागणी आ. बबनराव पाचपुते यांनी पत्रकार परिषदेत केली.

राज्यातील ५५ लाख हेक्टरहून अधिक शेतजमिनीवरील पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याची सरकारची प्राथमिक आकडेवारी आहे. प्रत्यक्षात १०० लाख हेक्टरहून अधिक जमिनीवरील पिके पूर्ण नष्ट झाली, पुरामुळे शेतजमिनी नापीक झाल्या आहेत. जमिनींचा कस संपल्यामुळे पुढील १० वर्षे कोणत्याही पिकाची शाश्वती राहिलेली नाही. सरकार हेक्टरी १० हजार देण्याच्या फसव्या मदतीची पाने पुसून शेतकऱ्यांची थट्टा करत आहे. जाहीर केलेल्या मदतीपैकी फुटकी कवडीदेखील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नसल्याने राज्यातील शेतकरी नैराश्यग्रस्त झाला असून, आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याने आघाडी सरकार शेतकऱ्यांचे बळी घेणारे सरकार ठरले आहे. सरकारला लाज असेल, तर यंदाची दिवाळी शेतकऱ्यांच्या दुःखाची दिवाळी म्हणून जाहीर करून 'मातोश्री' व 'वर्षा'वर रोषणाई न करण्याचे जाहीर करावे, असे ते म्हणाले.

गेल्या महिनाअखेरीपर्यंत शेतकऱ्यांनी पीक विम्याच्या २८ लाख पूर्वसूचना दाखल केल्या होत्या. त्यामध्ये आता आणखी काही लाख सूचनांची भर पडली आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, असे पोकळ आश्वासन देणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी विमा कंपन्यांना दिलेल्या ९७३ कोटींच्या रकमेपैकी शेतकऱ्यांच्या हातात फुटकी कवडीदेखील पडलेली नाही, याची सरकारला शरम वाटत नाही का, असा सवालही त्यांनी केला.

सरकारी अधिकारी व दलालांनी संगनमत करून शेतकऱ्यांची फसवणूक चालवली आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे पीक हातचे गेले. या पिकाच्या मोठ्या उत्पन्नाचे आमिष दाखवून शेतकऱ्यांची दिशाभूल केली. भेसळयुक्त खते, नित्कृष्ट बियाणे आणि फसवणुकीमुळे नागविला गेला असताना, अतिवृष्टीमुळे हातचे पीक वाया गेल्यावर मात्र सरकार मूग गिळून गप्प आहे, असा आरोप त्यांनी केला.

## पतसंस्था संचालकाचा रस्ता अपघातात मृत्यू

**राहुरी (वार्ताहर) :**



तालुक्यातील गुहा येथील प्रेरणा पतसंस्थेचे संचालक आप्पासाहेब बाप्पू चंद्रे (४२) यांचा रस्ता अपघातात मृत्यू झाला. चंद्रे गुरुवारी सायंकाळी ५ वाजता गुहा ते राहुरी प्रवास करीत असताना राजश्री हॉटेलजवळ खड्ड्यात आदळून ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र रात्री उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. चंद्रे यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदापासून कामाची सुरुवात केली. प्रेरणा पतसंस्थेचे १० वर्षांपासून ते संचालक होते.

## जिल्ह्याचे पालकमंत्रीपद सोडण्याचे हसन मुश्रीफ यांचे सूतोवाच

**संगमनेर (वार्ताहर) :** आगामी काळात नगर व कोल्हापूर जिल्ह्यांत निवडणुकांची रणधुमाळी सुरू होणार आहे. विधानपरिषदेसह कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कृषी उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर महानगरपालिका, ९ नगरपालिकांसह इतरही निवडणुका तोंडावर आहेत. या पार्श्वभूमीवर एका मंत्र्याला अशा स्थितीत २ जिल्ह्यांकडे लक्ष देणे अवघड असल्याने, तसेच होम ग्राऊंड म्हणून कोल्हा-पूरकडे लक्ष देणे आवश्यक आहे, असे वक्तव्य करत नगर जिल्ह्याचे पालकमंत्रीपद सोडण्याची इच्छा पक्षनेतृत्वाकडे व्यक्त केल्याच्या वृत्ताला पालकमंत्री तथा ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांनी दुजोरा दिला आहे.

काल सायंकाळी मुश्रीफांनी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांच्या निवासस्थानी भेट देत स्थानिक कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेतल्या. त्यावेळी ते पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना बोलत होते.

दरम्यान, नगर जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले मुश्रीफ यांनी पालकमंत्रीपद सोडण्याची इच्छा पक्षनेतृत्वाकडे व्यक्त केल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. ते काल सायंकाळी संगमनेरात आले असता त्यांना याबाबत पत्रकारांनी विचारणा केली होती. त्यांनी या वृत्ताला दुजोरा देताना मी अद्यापही नगर जिल्ह्याचा पालकमंत्री असल्याचे स्पष्ट केले. कोल्हापूरचे पालकमंत्री होण्याची इच्छा असतानाही, राजकीय गणितांमुळे त्यांना पावणेदोन वर्षांपूर्वी नगरचे पालकमंत्रीपद स्विकारावे लागले होते, असे यावेळी ते म्हणाले.

भाजपाने त्यांच्याबाबत केलेल्या आरोपांवर बोलताना ते म्हणाले, भाजपाच्या आरोपात तथ्य नसल्याचे सांगत, माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केलेल्या आरोपांसंदर्भात त्यांच्यावर दोन दावे केल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुश्रीफांसमवेत जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले, पोलिस अधीक्षक मनोज पाटील, प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे आदींसह राष्ट्रवादीचे संगमनेर तालुकाध्यक्ष आबासाहेब थोरात, दिलीप शिंदे, उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल मदने, पोलिस निरीक्षक मुकुंद देशमुख, सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप वायाळ, राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष संदीप वर्पे, शहराध्यक्ष प्रशांत वामन, अक्षय भालेराव, अमृता कोळपकर, अनिल कोळपकर, राहुल वर्पे, अमोल राऊत, माजी नगरसेवक शरीफ शेख, हाफीज शेख, अशोक काळे आदी उपस्थित होते.

## देडगाव येथून पाच वर्षीय मुलाचे अपहरण

**नेवासे (वार्ताहर) :** तालुक्यातील देडगाव येथून सत्यम संभाजी थोरात या ५ वर्षाच्या मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार प्रमिला शिवाजी थोरात (५५, देडगाव) यांनी दिली आहे.

नेवासे पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे, दि. २० रोजी देडगावला बालाजीची यात्रा होती. फिर्यादीचे पती नातवंडांना खाऊ व खेळण्यासाठी खेळणी घेऊन



आले. सायंकाळी सहाच्या सुमारास सर्व नातवंडे खाऊ खाल्ल्यानंतर खेळण्यास गेली. सायंकाळी सातच्या सुमारास सत्यम घरी आला नाही म्हणून फिर्यादीच्या घरातील सर्व नातेवाईकांनी सत्यमचा आजूबाजूला तसेच गावात शोध घेतला असता तो मिळून आला नाही.

सत्यमला कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेले आहे. सत्यमने निळ्या रंगाचा शर्ट व निळ्या रंगाची पँट घातलेली असून, उंची साडेतीन फूट, रंग काळा-सावळा, केस स्टाईल स्पाईक कट असे वर्णन आहे.

नेवासे पोलिसांत हरवल्याचा गुन्हा नोंद झाला असून, पोलिस तपास सुरू आहे. सत्यम आढळल्यास नेवासे पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## कर्जत नगरपंचायतीची निवडणूक महाविकास आघाडी एकत्र लढणार : आ. पवार

**कर्जत (वार्ताहर) :** नगरपंचायतीच्या आगामी निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी-काँग्रेस-शिवसेना आणि मित्र पक्षांची महाविकास आघाडी एकत्र येऊन निवडणूक लढवणार असल्याचे आ. रोहित पवारांनी जाहीर केले.

माजी उपनगराध्यक्ष बापूसाहेब नेटके यांचे चिरंजीव डॉ निखिल आणि डॉ. सौ. अंकिता नेटके यांनी सुरू केलेल्या साईरत्न हॉस्पिटल व मातोश्री मेडिकलच्या उद्घाटनप्रसगी आ. पवार बोलत होते. नेटकेंना राजकीय भाकित कळत असल्यामुळे राजकारणामध्ये त्यांना जवळ बाळगण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

यावेळी सौ.राणी लंके, दयानंद महाराज कोरेगावकर, प्रकाश महाराज जंजिरे, डॉ. गोपाळ बहिरूपी, बाळासाहेब साळुंखे, नामदेव राऊत, राजेंद्र गुंड, दादासाहेब थोरात आदींसह मान्यवर उपस्थित होते.

## अकोल्यात उद्या महाराष्ट्र केसरीसाठी जिल्हा संघाच्या निवड स्पर्धेचे आयोजन

**अकोले (वार्ताहर) :** जिल्हा महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी तालुका तालीम संघाकडून कुस्तीगीर स्पर्धक निवड करण्यात येणार आहे. तालुक्यातून जिल्हा पातळीवर पाठविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र केसरी निवड चाचणी स्पर्धेसाठी उद्या (रविवारी) कुस्तीगीर निवड करण्यात येणार आहे. या स्पर्धा राजूर येथील मनोहरराव देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गादी व माती दोन्ही प्रकारांत आयोजित करण्यात आल्या आहेत.

या स्पर्धेसाठी तालुक्यातील कुस्तीगीर खेळाडूंनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन तालुका तालीम संघाचे अध्यक्ष बबलू धुमाळ यांनी केले आहे.

या स्पर्धा उद्या सकाळी ९.३० ते १०.३० दरम्यान होणार असून, इच्छुक कुस्तीगीरांनी सोबत आपले आधारकार्ड, झेरॉक्स व पासपोर्ट फोटो आणावेत. तसेच ग्रिको रोमन स्पर्धा खेळलेल्या खेळाडूंना या स्पर्धेत खेळता येणार नाही. खेळाडूचा जन्म २००३ पूर्वीचा असावा. स्पर्धेसाठी गादी व माती विभागाचे वजन गट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२, ९७, १२५ किलो (महाराष्ट्र केसरी गट) असे आहेत.

